स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
शिक्षण संचालनालय (योजना),महाराष्ट्र राज्य
१७,डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१.
दूरध्वनीक्रमांक :-०२०/२६१२६७२६/२६१२३५१५ E-mail Id:- directorscheme.mh@gmail.com

जा.क्र.शिसंयो/नभासा/मार्गदर्शक सूचना /२०२३-२४/ 1322 दि. ४/७/२०२३

प्रति,

**१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व.**
**२. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)**
**३. शिक्षणाधिकारी –प्राथमिक/माध्यमिक/योजना (सर्व)**
**४. शिक्षण निरीक्षक, मुंबई- (दक्षिण/पश्चिम/उत्तर)**
**५. प्रशासन अधिकारी/शिक्षणाधिकारी (म.न.पा./न.पा)**
**६. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)**

विषय:- **केंद्र पुरस्कृत नव भारत साक्षरता कार्यक्रम (सन २०२२-२७)- स्वयंसेवक व निरक्षरांचे सर्वेक्षण तसेच कामकाजाबाबतच्या मार्गदर्शक सूचना/प्रशासकीय मार्गदर्शक नियमावली निर्गमित करणेबाबत.**

संदर्भ:- १. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:नभासाका-०३२२/प्र.क्र.३९/एस.डी.२ दि.१४.१०.२०२२ व दि.२५.०१.२०२३
२.मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षेतेखाली दि.१८.०४.२०२३ रोजी संपन्न राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण-नियामक परिषद बैठकीचे मंजूर इतिवृत्त दि.११.०५.२०२३
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई दि.२४.६.२०२२ मधील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०, प्रौढ शिक्षण विषयक टास्क क्र. २५०,२५२,२५५,२५७.
४. केंद्र शासनाचे पत्र जा.क्र. ९-२/२०२१-एन.एल.एम-१ (भाग-१) दि.२८.६.२०२३

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्यामध्ये संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णय दि.१४.१०.२०२२ अन्वये सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत (६० महिने) **"नव भारत साक्षरता कार्यक्रम"** योजनेची अंमलबजावणी करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय दि.२५.१.२०२३ अन्वये सदर योजनेच्या नियोजन व अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा, गट व शाळा स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.२ अन्वये, मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षेतेखाली दि.१८.०४.२०२३ रोजी संपन्न झालेल्या राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण- नियामक परिषदेच्या बैठकीमध्ये केंद्र/राज्य शासनाच्या सूचनांप्रमाणे नव भारत साक्षरता कार्यक्रम योजनेचे कामकाज पूर्ण करणेबाबत निर्देशित केलेले आहे. संदर्भ क्र.३ मधील शासन निर्णयानुसार मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (National Education policy)- २०२० मधील साक्षरता कार्याक्रमासंबंधित टास्कच्या पूर्ततेसाठी नव भारत साक्षरता कार्यक्रम योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही प्रभावीपणे करणेबाबत वेळोवेळी सूचित केलेले आहे.

केंद्र पुरस्कृत नव भारत साक्षरता कार्यक्रम योजनेसाठी **साक्षरतेकडून समृध्दीकडे** (**From Literacy to Prosperity) ही Tag Line** देण्यात येत आहे. योजनेचा कालावधी एप्रिल २०२२ ते मार्च २०२७ असा आहे. राज्यात मागील आर्थिक वर्षात (सन २०२२-२३) राज्याकरीता ६ लक्ष २० हजार एवढे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले होते. विविध कारणामुळे प्रत्यक्षात याबाबतची कार्यवाही व अंमलबजावणी संदर्भ क्र.१ चे शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतरच सूरू करण्यात आलेले आहे. त्यामुळे मागील वर्षाचे उद्दिष्ट आणि चालू वर्षातील २०२३-२४ चे ६ लक्ष २० हजार उद्दिष्ट लक्षात घेता चालू आर्थिक वर्षात **एकूण १२ लक्ष ४० हजार उद्दिष्टानुसार** राज्यात कार्यवाही करणे अपेक्षित आहे. प्रत्येक जिल्हयाचे दोन्ही वर्षांचे उद्दिष्ट राज्यस्तरावरून निश्चित करून देण्यात आलेले आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सर्वेक्षण (स्वयंसेवकांचे व निरक्षरांचे) व पुढील कामकाजाबाबतच्या पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना/प्रशासकीय मार्गदर्शक नियमावली निर्गमित करण्यात येत आहेत.

**१) जिल्हा , तालुका व शाळा स्तर समिती -**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दि.२१.०१.२०२३ अन्वये जिल्हास्तर, तालुकास्तर समित्यांची स्थापना करणे व संबंधित सदस्य सचिव यांनी समित्यांमधील सदस्यांना याबाबत लेखी अवगत करणे.

२. वार्षिक वेळापत्रकानुसार जिल्हा/तालुका स्तरीय नियामक समितीची व कार्यकारी समितीची बैठक आयोजित करणे, नियामक परिषदेमध्ये राज्यस्तरावरून निर्धारित केलेल्या उद्दिष्टानुसार (निरक्षर संख्या) जिल्हास्तरावर करावयाच्या खर्चास मान्यता घेणे व कार्यकारी समितीच्या मान्यतेने अंमलबजावणीचे नियोजन करून कार्यवाही करणे.

३. सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या कालावधीसाठी राज्यस्तरावरून निश्चित करून देण्यात आलेल्या उद्दिष्टाप्रमाणे (निरक्षर संख्या) जिल्हास्तर समितीच्या मान्यतेने जिल्हयातील प्रत्येक तालुक्यासाठीचे उद्दिष्ट निश्चित करावे तसेच तालुकास्तर समितीच्या मान्यतेने प्रत्येक महसूली गावाचे आणि महसूली गावांतर्गत शाळांसाठीचे उद्दिष्ट निश्चित करावे. (या योजनेसाठी दरवर्षी असे उद्दिष्ट निश्चित करावयाचे आहे ही बाब लक्षात घ्यावी)

४. जिल्हा, तालुकास्तरीय समित्यांव्दारे वेळोवेळी दिलेल्या सूचनांवर कार्यवाही करणे हे सर्व संबंधित शाळा, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना बंधनकारक राहील.

**२) स्वयंसेवकांचे सर्वेक्षण –**

१. **'शाळा'** हे योजनेचे अंमलबजावणीसाठी एकक (Unit) असून ग्रामीण व शहरी भागांमध्ये स्वयंसेवकांचे/स्वयंसेवी शिक्षकांचे सर्वेक्षण शाळांकडून ऑनलाईन पध्दतीने NILP Mobile Survey App (सर्वेक्षण ॲप) व्दारे करण्यात यावे. याबाबतचे प्रशिक्षण SCERT, पुणे यांच्यामार्फत Youtube Live व्दारे राज्यातील सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक यांना दि.०२.०६.२०२३ रोजी देण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाबाबतची Youtube लिंक https:// Youtube.com/live/F4mVaLbOFjk?feature= share ही आहे.

२. या योजनेत सहाय्य करणारे/सहभागी असलेले स्वयंसेवक सेवाभावी वृत्तीने काम करणारे असतील. त्यासाठी त्यांना त्यांच्या सेवांसाठी कोणतेही वेतन /मानधन दिले जाणार नाही.

३. स्वयंसेवक इयत्ता ८ वी आणि त्यावरील शालेय विद्यार्थी असतील जे त्यांच्या स्वतःच्या कुटुंबातील अशिक्षित सदस्यांना शिक्षित होण्यासाठी मदत करतील. तसेच ज्या शालेय विद्यार्थ्यांच्या कुटुंबामध्ये निरक्षर व्यक्ती नाहीत अशा विद्यार्थ्यांना (स्वयंसेवकांना) त्यांचे शेजारचे निरक्षरांना मदत करण्यासाठी शाळांमार्फत निर्धारित करण्यात यावे. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून काम करण्यास प्रोत्साहीत करणेबाबत सूचित करावे

४. सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शासनमान्य प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक हे देखील स्वयंसेवक असतील. तसेच शिक्षक पदाचे शिक्षण घेणारे/उच्च शिक्षण संस्था मधील विद्यार्थी (NCTE अंतर्गत TEIs-M.ED/B.ED/.D.EL.ED/B.T.C/J.B.T.etc तसेच उच्च शिक्षण संस्थांमधील/महाविद्यालयांमधील अन्य पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम) हे दरवर्षी ३-४ निरक्षरांना शिकवतील त्याबाबतचे निर्धारण त्या-त्या संस्था प्रमुख/प्राचार्य यांच्यामार्फत करण्यात यावे. पंचायत राज संस्था, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच Nehru Yuva Kendra Sangathan (NYKS), National Service Scheme (NSS), National cadet Corps (NCC) व स्काऊट गाईडमधील विद्यार्थी /विद्यार्थीनी आणि इतर स्वयंसेवी संस्था (NGOs) यांचा देखील सहभाग घेण्यात यावा.

५. तालुक्यातील शाळा, महाविद्यालये आणि निरक्षरांची संख्या यांच्या प्रमाणात स्वयंसेवकांची उपलब्धता निश्चित करण्यात यावी याबाबतची जबाबदारी तालुकास्तर समितीने पार पाडावी.

६. NIC (National Informatics Centre) व्दारे योजनेचे केंद्रीय पोर्टल विकसित करण्यात आले असून त्याव्दारे NILP – Online Mobile App व्दारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणाची एकत्रित माहिती जमा करण्यात येईल.

**३) स्वयंसेवकांची निवड व प्रशिक्षण –**

१. विद्यांजली platform च्या माध्यमातून लोकहितकारी /CSR संस्थांचा ऐच्छिक सहभाग घेण्यात यावा. मनुष्यबळ, भौतिक साधन सुविधा व मानवी संसाधने याबाबत CSR मधून निधी उपलब्ध होणेस्तव विद्यांजली platform चा जिल्हा/तालुका/शाळा स्तरावरून वापर करता येईल.

२. स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, दिशानिर्देश, कार्यशाळा याबाबी प्रत्यक्षपणे (ऑफलाईन ) SCERT, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) यांच्यामार्फत आयोजित करण्यात येतील. याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक SCERT, पुणे यांच्यामार्फत www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

३. राज्य, जिल्हा, तालुकास्तरीय समित्यांव्दारे वेळोवेळी दिलेल्या सूचना स्वयंसेवकांची निवड व सर्वेक्षण करताना शाळांना बंधनकारक असतील तसेच प्रत्येक स्वरावर समिती सदस्यांची आवश्यकतेनुसार मदत घेण्यात यावी. सर्वसाधारण किमान १० निरक्षरांकरीता एक स्वयंसेवक निश्चित करण्यात यावा. अपवादात्मक स्थितीत एकास एक स्वयंसेवक निश्चित करता येईल.

**४) स्वयंसेवकांचे मूल्यमापन व कामकाज पध्दती –**

१. स्वयंसेवक म्हणून सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांच्या (शाळा/महाविद्यालयीन) शिकविण्याचे मूल्यमापन करून गुणांक/क्रेडीट देण्यात येतील. गुणांक/ क्रेडीट देताना सुरूवातीचा अहवाल व अंतिम प्रगती अहवाल निश्चिती पध्दत/निकष शाळांसाठी (इ.८वी ते इ.१२ वी) SCERT, पुणे यांच्यामार्फत निश्चित करण्यात येतील व महाविद्यालयांसाठी (पदवी पासून पुढे) विद्यापीठामार्फत निश्चित करण्यात येतील.

२. स्वयंसेवकांच्या कामकाजाचा आढावा घेणे व कार्यपध्दतीने मूल्यमापन करणे याबाबतची जबाबतदारी SCERT, पुणे यांची असेल.

**५) निरक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण –**

१. **'शाळा'** हे योजनेचे अंमलबजावणीसाठी एकक (Unit) असून ग्रामीण व शहरी भागांमध्ये लाभार्थी/निरक्षर व्यक्ती/शिकाऊ व्यक्ती यांचे सर्वेक्षण शाळांनी तालुकास्तर समितीने निश्चित करून दिलेल्या उद्दिष्टानुसार (निरक्षर संख्या) ऑनलाईन पध्दतीने NILP Mobile Survey App (सर्वेक्षण ॲप) व्दारे स्वयंसेवकांमार्फत सर्वेक्षण करावे.

२. प्राधान्य क्रम लक्ष्यगट –

१) वय वर्षे १५ ते ३५ हा वयोगट प्रथमत:या अभियानात सामावून त्यांना साक्षर करण्यात यावे. तद्नंतर वय वर्षे ३५ व त्यापेक्षा अधिक वयोगटाचा विचार करण्यात यावा.

२) श्रेणीप्रमाणे प्राधान्यक्रम - मुली आणि महिला, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास प्रवर्ग /अल्पसंख्याक वर्ग, विशेष गरजा असलेल्या व्यक्ती/दिव्यांग व्यक्ती, अन्य वंचित घटक/भटक्या व्यक्ती/बांधकाम कामगार/मंजूर वर्ग इत्यादी.

३) SCERT, पुणे यांच्यामार्फत ऑनालईन पध्दतीने राज्य, जिल्हा, तालुका व शाळा स्तरावर प्रगतीचे निरीक्षण केले जाईल. UDISE प्रणालीवर NIC व्दारे उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या Tab वर शाळानिहाय निरक्षरांच्या प्रगतीची नोंद शाळेमार्फत केली जाईल.

**६) निरक्षरांना प्रत्यक्ष अध्ययन - अध्यापन –**

१. शाळा आणि उच्च शिक्षण संस्था/महाविद्यालयांमधील पायाभूत सुविधांचा वापर दररोज शाळा सूरू होण्यापूर्वी १ तास व शाळा सुटल्यानंतर १ तास आणि सुटटीच्या दिवशी १ तास अध्ययन-अध्यापनासाठी करण्यात यावा. तसेच गावातील common service centre, community centres यांचाही उपयोग अध्ययन-अध्यापनासाठी करण्यात यावा.

२. केंद्र शासनाच्या दि.२८/०६/२०२३ रोजीच्या मार्गदर्शक पत्रानुसार निरक्षरांना करावयाचे अध्ययन अध्यापन ऑनलाईन बरोबरच ऑफलाईन पध्दतीने करणेबाबत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

३. निरक्षरांना साक्षर करण्यासाठीचे टप्पेनिहाय अभ्यासक्रम साहित्य विकसन, स्तरमापन चाचण्या निर्मिती, प्रमाणपत्र वितरण, स्वयंसेवकांनी करावयाचे अध्ययन-अध्यापन कामकाज इ.बाबींचे वेळापत्रक SCERT, पुणे यांच्यामार्फत www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

४. SCERT, पुणे अंतर्गत स्थापित SCL (State Literacy Centre) केंद्राने विकासित केलेला अध्ययन अध्यापनासाठीचा ई- Content दिक्षा पोर्टलवर किंवा लिंकव्दारे SCERT, पुणे यांच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. सदरच्या ई-Content चा उपयोग प्रभावीपणे अध्ययन - अध्यापनात करण्यात यावा.

५. कोणताही निरक्षर OTLAS (Online Teaching Learning and Assessment System) कोणत्याही ठिकाणी थेट नोंदणी करून योजनेचा लाभ मिळवू शकतो आणि कोणताही स्वयंसेवी शिक्षक ऑनलाईन किंवा ऑफलाईन साक्षरता वर्ग किंवा एकास एक या सूत्रानुसार निरक्षरांना शिकविण्यासाठी आपली सेवा देऊ शकतो.

६. अभ्यासक्रम /पाठयक्रम (Content) विविध प्रकारच्या डिजिटल माध्यमांव्दारे जसे की, टी.व्ही, रेडिओ, मोबाईल आधारित मोफत ओपन सोर्स ॲप/पोर्टल्स इ.व्दारे SCERT, पुणे मार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.

७. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांच्यामार्फत निरक्षरांच्या अध्ययन अध्यापनासाठी तयार करण्यात आलेला ई- Content हा www.ebalbharti.in या संकेतस्थळावरील उपलब्ध करून देण्यात येईल.

८. या योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी Outcome Output Monitoring Framework (OOMF) आणि ऑनलाईन MIS प्रणाली असेल.

**७) स्तरमापन चाचणी परीक्षा (मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणी परीक्षा) व विविध स्पर्धांचे आयोजन-**

१. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ (State Institute of Open School -SIOS), पुणे यांच्यामार्फत निरक्षरांसाठीच्या स्तरमापन चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात येईल व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील. अथवा SLMA निर्धारित करेल अशा संस्थेकडून याबाबतची कार्यवाही केली जाईल.

२. SCERT, पुणे यांच्यामार्फत अभ्यासक्रम तयार करण्यात येत असून सदर अभ्यासक्रमावर आधारित चाचणी परीक्षा प्रश्नावली तयार करण्यात येईल.

३. सदर कार्यक्रमांतर्गत निरक्षरांना साक्षर करावयाच्या अनुषंगाने साक्षरतेचे महत्व पटवून देण्यासाठी दरवर्षी दिनांक ८ सप्टेंबर या **'जागतिक साक्षरता दिनी'** शाळा व महाविद्यालय स्तरावर निबंध स्पर्धा, चित्रकलास्पर्धा, वकृत्वस्पर्धा व वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करून प्रमाणपत्र देण्यात यावेत तसेच गाव/शहर पातळीवर प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे.

४. सदर कार्यक्रमात ग्रामपंचायतीचा सहभाग घेण्यात यावा, त्यांच्या स्पर्धा आयोजित करून ग्रामपंचायत स्तरावरील निधीतून बक्षिसे द्यावीत, ग्रामपंचायतीना गुणांक देऊन क्रमवारी ठरविणे तसेच दरवर्षी दिनांक २४ एप्रिल या **'पंचायत राज दिनी'** ग्रामपंचयतीना प्रमाणपत्र प्रदान करावेत याबाबतचे निकष जिल्हा परिषद स्तरावर ठरविण्यात यावेत.

५. नव भारत साक्षरता कार्यक्रमाबाबतचा उल्लेख २६ जानेवारी या '**प्रजासत्ताक दिनी**' व १५ ऑगस्ट या '**स्वातंत्र्य दिनी**' जिल्हयाचे मा. पालकमंत्री व मा. लोकप्रतिनिधी यांच्या भाषणामध्ये करून कार्यक्रमाचे महत्व पटवून प्रेरणा देणेबाबत आवश्यक ते प्रयत्न करावेत. तसेच प्रभातफेरीतून NILP योजनेबाबत जन जागृती करावी.

**सहपत्र-**

१. **प्रपत्र अ-** महाराष्ट्रातील १५ वर्ष व त्यावरील निरक्षर व्यक्तींची संख्या.
२. **प्रपत्र ब -** सन २०२२-२३ व सन २०२३-२४ चे एकूण उद्दिष्ट(निरक्षर संख्या).
३. **प्रपत्र क-** सन २०२२-२३ व सन २०२३-२४ चे लिंग, SC, ST, अल्पसंख्याक व इतर यांचे एकूण उद्दिष्ट (निरक्षर संख्या).
४. **प्रपत्र ड-** योजनेचे वार्षिक वेळापत्रक (संभाव्य).
५. **प्रपत्र इ -** जिल्हा व तालुकास्तरीय बैठका तसेच स्तरमापन चाचणी परीक्षांचे वेळापत्रक (संभाव्य).

MPalkar

**(डॉ. महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
शिक्षण संचालनालय (योजना)
महाराष्ट्र राज्य, पुणे तथा सदस्य
सचिव, राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण

**प्रत —**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.
३. मा. जिल्हाधिकारी (सर्व)
४. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
५. मा. आयुक्त महानगरपालिका (सर्व)
६. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्राशिक्षण संस्था, महाराष्ट्र, पुणे.
७. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
८. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती)
११. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे.
१२. विभागीय संचालक, राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, पुणे.
१३. विभाग प्रमुख, प्रौढ शिक्षण सावित्रबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
१४. सदस्य सचिव, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंमलबजावणी समिती तथा संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र पुणे
१५. तहसिलदार, सर्व
१६. गटविकास अधिकारी, पंचायत समिती , सर्व
१७. मुख्याधिकारी नगरपालिका /नगरपरिषद, सर्व.
१८. अध्यक्ष/सचिव, शाळा व्यवस्थापन समिती/ अध्यक्ष/सचिव, शाळा व्यवस्थापन व विकास समिती.

प्रपत्र-अ

| महाराष्ट्रातील १५ वर्षे व त्यावरील निरक्षर व्यक्तींची संख्या | | | |
|---|---|---|---|
| | | | जनगणना-२०११ नुसार |
| Sr.No. | Name of district | No. of Illiterate Person (15+ Age group) | % |
| 1 | Ahmednagar | 784324 | 4.81 |
| 2 | Akola | 176760 | 1.08 |
| 3 | Amravati | 306800 | 1.88 |
| 4 | Aurangabad | 622115 | 3.82 |
| 5 | Bhandara | 165629 | 1.02 |
| 6 | Beed | 490362 | 3.01 |
| 7 | Buldhana | 350350 | 2.15 |
| 8 | Chandrapur | 377177 | 2.31 |
| 9 | Dhule | 435006 | 2.67 |
| **10** | **Gadchiroli** | **232121** | **1.42** |
| 11 | Gondia | 168878 | 1.04 |
| 12 | Hingoli | 208339 | 1.28 |
| 13 | Jalgaon | 734335 | 4.5 |
| 14 | Jalna | 445985 | 2.74 |
| 15 | Kolhapur | 608097 | 3.73 |
| 16 | Latur | 452549 | 2.78 |
| 17 | Mumbai City | 279095 | 1.71 |
| 18 | Mumbai Suburban | 781919 | 4.8 |
| 19 | Nagpur | 450489 | 2.76 |
| 20 | Nanded | 666075 | 4.09 |
| **21** | **Nandurbar** | **451336** | **2.77** |
| 22 | Nashik | 860258 | 5.28 |
| **23** | **Osmanabad** | **297456** | **1.82** |
| 24 | Palghar | 681573 | 4.18 |
| 25 | Parbhani | 395277 | 2.42 |
| 26 | Pune | 1067823 | 6.55 |
| 27 | Raigad | 366247 | 2.25 |
| 28 | Ratnagairi | 250406 | 1.54 |
| 29 | Sangli | 442807 | 2.72 |
| 30 | Satara | 434099 | 2.66 |
| 31 | Sindudhurg | 106395 | 0.65 |
| 32 | Solapur | 824484 | 5.06 |
| 33 | Thane | 681574 | 4.18 |
| 34 | Wardha | 146281 | 0.9 |
| **35** | **Washim** | **165537** | **1.02** |
| 36 | Yavatmal | 395814 | 2.43 |
| | **Total** | **16303772** | **100** |

'प्रपत्र- ब'

**New India Literacy Programme(NILP)- 2022-23 & 2023-24**

| Sr. No. | Name of districts | No. of illiterate 2022-23 | No. of illiterate 2023-24 | Total no. of illiterate (Target ) | Total no. of VTs (Target ) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Ahmednagar | 20702 | 22458 | 43160 | 4316 |
| 2 | Akola | 6250 | 5061 | 11311 | 1131 |
| 3 | Amravati | 9418 | 8785 | 18203 | 1820 |
| 4 | Aurangabad | 17837 | 17813 | 35650 | 3565 |
| 5 | Bhandara | 4427 | 4742 | 9169 | 917 |
| 6 | Beed | 14582 | 14042 | 28624 | 2862 |
| 7 | Buldhana | 11327 | 10032 | 21359 | 2136 |
| 8 | Chandrapur | 9374 | 10800 | 20174 | 2017 |
| 9 | Dhule | 11154 | 12456 | 23610 | 2361 |
| 10 | **Gadchiroli** | **37200** | **37659** | **74859** | **7486** |
| 11 | Gondia | 4817 | 4835 | 9652 | 965 |
| 12 | Hingoli | 6250 | 5965 | 12215 | 1221 |
| 13 | Jalgaon | 19790 | 21026 | 40816 | 4082 |
| 14 | Jalna | 11284 | 12770 | 24054 | 2405 |
| 15 | Kolhapur | 15450 | 17412 | 32862 | 3286 |
| 16 | Latur | 11761 | 12958 | 24719 | 2472 |
| 17 | Mumbai City | 8289 | 7991 | 16280 | 1628 |
| 18 | Mumbai Suburban | 26040 | 22389 | 48429 | 4843 |
| 19 | Nagpur | 14322 | 12899 | 27221 | 2722 |
| 20 | Nanded | 17447 | 19072 | 36519 | 3652 |
| 21 | **Nandurbar** | **68820** | **73225** | **142045** | **14205** |
| 22 | Nashik | 28253 | 24632 | 52885 | 5288 |
| 23 | **Osmanabad** | **48360** | **48259** | **96619** | **9662** |
| 24 | Palghar | 20398 | 19514 | 39912 | 3991 |
| 25 | Parbhani | 10025 | 11318 | 21343 | 2134 |
| 26 | Pune | 33375 | 30575 | 63950 | 6395 |
| 27 | Raigad | 10373 | 10487 | 20860 | 2086 |
| 28 | Ratnagairi | 6336 | 7170 | 13506 | 1351 |
| 29 | Sangli | 11458 | 12679 | 24137 | 2414 |
| 30 | Satara | 11414 | 12430 | 23844 | 2384 |
| 31 | Sindudhurg | 2691 | 3046 | 5737 | 574 |
| 32 | Solapur | 21309 | 23607 | 44916 | 4492 |
| 33 | Thane | 20398 | 19515 | 39913 | 3992 |
| 34 | Wardha | 5123 | 4188 | 9311 | 931 |
| 35 | **Washim** | **31620** | **26857** | **58477** | **5848** |
| 36 | Yavatmal | 12326 | 11333 | 23659 | 2366 |
|  | **Total:** | **620000** | **620000** | **1240000** | **124000** |

*Ratio between illiterates and volunteers will be 10:1

'प्रपत्र- क'

# NILP- Physical Target 2022-23 and 2023-24

| S.No | DISTRICT NAME | F YEAR | GENERAL MALE | GENERAL FEMALE | GENERAL TRANSGENDER | GENERAL TOTAL | SC MALE | SC FEMALE | SC TRANSGENDER | SC TOTAL | ST MALE | ST FEMALE | ST TRANSGENDER | ST TOTAL | MINORITY MALE | MINORITY FEMALE | MINORITY TRANSGENDER | MINORITY TOTAL | TOTAL MALE | TOTAL FEMALE | TOTAL TRANSGENDER | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AHMADNAGAR | 2023-2024 | 10642 | 16016 | 0 | 26658 | 1615 | 2841 | 0 | 4456 | 1774 | 2896 | 0 | 4670 | 3055 | 4321 | 0 | 7376 | 17086 | 26074 | 0 | 43160 |
| 2 | AKOLA | 2023-2024 | 2574 | 4143 | 0 | 7017 | 393 | 729 | 0 | 1122 | 431 | 772 | 0 | 1203 | 830 | 1140 | 0 | 1970 | 4528 | 6784 | 0 | 11312 |
| 3 | AMRAVATI | 2023-2024 | 4871 | 6396 | 0 | 11267 | 660 | 1181 | 0 | 1841 | 730 | 1222 | 0 | 1952 | 1328 | 1813 | 0 | 3141 | 7589 | 10612 | 0 | 18201 |
| 4 | AURANGABAD | 2023-2024 | 8773 | 13274 | 0 | 22047 | 1307 | 2332 | 0 | 3639 | 1453 | 2387 | 0 | 3840 | 2531 | 3594 | 0 | 6125 | 14064 | 21587 | 0 | 35651 |
| 5 | BHANDARA | 2023-2024 | 2244 | 3420 | 0 | 5664 | 313 | 632 | 0 | 945 | 336 | 655 | 0 | 991 | 604 | 965 | 0 | 1569 | 3497 | 5672 | 0 | 9169 |
| 6 | BID | 2023-2024 | 7108 | 10603 | 0 | 17711 | 1082 | 1825 | 0 | 2907 | 1163 | 1913 | 0 | 3076 | 2054 | 2875 | 0 | 4929 | 11407 | 17216 | 0 | 28623 |
| 7 | BULDANA | 2023-2024 | 5210 | 8022 | 0 | 13232 | 753 | 1391 | 0 | 2144 | 845 | 1440 | 0 | 2285 | 1513 | 2185 | 0 | 3698 | 8321 | 13038 | 0 | 21359 |
| 8 | CHANDRAPUR | 2023-2024 | 5074 | 7375 | 0 | 12449 | 766 | 1334 | 0 | 2100 | 817 | 1373 | 0 | 2190 | 1365 | 2070 | 0 | 3435 | 8022 | 12152 | 0 | 20174 |
| 9 | DHULE | 2023-2024 | 6003 | 8573 | 0 | 14576 | 868 | 1580 | 0 | 2448 | 1021 | 1538 | 0 | 2559 | 1707 | 2320 | 0 | 4027 | 9599 | 14011 | 0 | 23610 |
| 10 | GADCHIROLI | 2023-2024 | 18471 | 27813 | 0 | 46284 | 2816 | 4839 | 0 | 7655 | 3169 | 4899 | 0 | 8068 | 4932 | 7919 | 0 | 12851 | 29388 | 45470 | 0 | 74858 |
| 11 | GONDIYA | 2023-2024 | 2349 | 3620 | 0 | 5969 | 314 | 671 | 0 | 985 | 349 | 691 | 0 | 1040 | 631 | 1027 | 0 | 1658 | 3643 | 6009 | 0 | 9652 |
| 12 | HINGOLI | 2023-2024 | 2948 | 4612 | 0 | 7560 | 447 | 792 | 0 | 1239 | 478 | 834 | 0 | 1312 | 855 | 1250 | 0 | 2105 | 4728 | 7488 | 0 | 12216 |
| 13 | JALGAON | 2023-2024 | 10257 | 14960 | 0 | 25217 | 1487 | 2714 | 0 | 4201 | 1693 | 2718 | 0 | 4411 | 2898 | 4087 | 0 | 6985 | 16335 | 24479 | 0 | 40814 |
| 14 | JALNA | 2023-2024 | 5749 | 9099 | 0 | 14848 | 933 | 1564 | 0 | 2497 | 977 | 1631 | 0 | 2608 | 1692 | 2408 | 0 | 4100 | 9351 | 14702 | 0 | 24053 |
| 15 | KOLHAPUR | 2023-2024 | 7849 | 12437 | 0 | 20286 | 1223 | 2186 | 0 | 3409 | 1249 | 2315 | 0 | 3564 | 2315 | 3288 | 0 | 5603 | 12636 | 20226 | 0 | 32862 |
| 16 | LATUR | 2023-2024 | 6151 | 9113 | 0 | 15264 | 961 | 1597 | 0 | 2558 | 984 | 1693 | 0 | 2677 | 1752 | 2468 | 0 | 4220 | 9848 | 14871 | 0 | 24719 |
| 17 | MUMBAI (City) | 2023-2024 | 4584 | 5489 | 0 | 10073 | 572 | 1082 | 0 | 1654 | 667 | 1083 | 0 | 1750 | 1285 | 1518 | 0 | 2803 | 7108 | 9172 | 0 | 16280 |
| 18 | MUMBAI (SUB.) | 2023-2024 | 12429 | 17586 | 0 | 30015 | 1725 | 3117 | 0 | 4842 | 1865 | 3306 | 0 | 5171 | 3688 | 4711 | 0 | 8399 | 19707 | 28720 | 0 | 48427 |
| 19 | NAGPUR | 2023-2024 | 7122 | 9738 | 0 | 16860 | 977 | 1763 | 0 | 2740 | 1059 | 1855 | 0 | 2914 | 1993 | 2715 | 0 | 4708 | 11151 | 16071 | 0 | 27222 |
| 20 | NANDED | 2023-2024 | 8934 | 13619 | 0 | 22553 | 1401 | 2374 | 0 | 3775 | 1451 | 2501 | 0 | 3952 | 2569 | 3669 | 0 | 6238 | 14355 | 22163 | 0 | 36518 |
| 21 | NANDURBAR | 2023-2024 | 36980 | 50780 | 0 | 87760 | 5012 | 9614 | 0 | 14626 | 6148 | 9204 | 0 | 15352 | 10262 | 14046 | 0 | 24308 | 58402 | 83644 | 0 | 142046 |
| 22 | NASHIK | 2023-2024 | 13614 | 19157 | 0 | 32771 | 1848 | 3450 | 0 | 5298 | 2203 | 3447 | 0 | 5650 | 3994 | 5171 | 0 | 9165 | 21659 | 31225 | 0 | 52884 |
| 23 | OSMANABAD | 2023-2024 | 24064 | 35687 | 0 | 59751 | 3737 | 6124 | 0 | 9861 | 3971 | 6434 | 0 | 10405 | 6824 | 9777 | 0 | 16601 | 38596 | 58022 | 0 | 96618 |
| 24 | PALGHAR | 2023-2024 | 10216 | 14483 | 0 | 24699 | 1473 | 2578 | 0 | 4051 | 1677 | 2612 | 0 | 4289 | 3065 | 3810 | 0 | 6875 | 16431 | 23483 | 0 | 39914 |
| 25 | PARBHANI | 2023-2024 | 5110 | 8064 | 0 | 13174 | 825 | 1391 | 0 | 2216 | 839 | 1475 | 0 | 2314 | 1506 | 2133 | 0 | 3639 | 8280 | 13063 | 0 | 21343 |
| 26 | PUNE | 2023-2024 | 16154 | 23444 | 0 | 39598 | 2361 | 4090 | 0 | 6451 | 2532 | 4321 | 0 | 6853 | 4741 | 6307 | 0 | 11048 | 25788 | 38162 | 0 | 63950 |
| 27 | RAIGARH | 2023-2024 | 5002 | 7896 | 0 | 12898 | 753 | 1380 | 0 | 2133 | 903 | 1345 | 0 | 2248 | 1517 | 2064 | 0 | 3581 | 8175 | 12685 | 0 | 20860 |
| 28 | RATNAGIRI | 2023-2024 | 3038 | 5299 | 0 | 8337 | 509 | 893 | 0 | 1402 | 578 | 886 | 0 | 1464 | 889 | 1413 | 0 | 2302 | 5014 | 8491 | 0 | 13505 |
| 29 | SANGLI | 2023-2024 | 5880 | 9023 | 0 | 14903 | 904 | 1594 | 0 | 2498 | 925 | 1690 | 0 | 2615 | 1690 | 2430 | 0 | 4120 | 9399 | 14737 | 0 | 24136 |
| 30 | SATARA | 2023-2024 | 5665 | 9061 | 0 | 14726 | 883 | 1580 | 0 | 2463 | 987 | 1594 | 0 | 2581 | 1646 | 2429 | 0 | 4075 | 9181 | 14664 | 0 | 23845 |
| 31 | SINDHUDURG | 2023-2024 | 1329 | 2213 | 0 | 3542 | 209 | 387 | 0 | 596 | 235 | 387 | 0 | 622 | 385 | 593 | 0 | 978 | 2158 | 3580 | 0 | 5738 |
| 32 | SOLAPUR | 2023-2024 | 11147 | 16588 | 0 | 27735 | 1732 | 2918 | 0 | 4650 | 1794 | 3072 | 0 | 4866 | 3123 | 4543 | 0 | 7666 | 17796 | 27121 | 0 | 44917 |
| 33 | THANE | 2023-2024 | 10216 | 14484 | 0 | 24700 | 1473 | 2578 | 0 | 4051 | 1676 | 2612 | 0 | 4288 | 3066 | 3811 | 0 | 6877 | 16431 | 23485 | 0 | 39916 |
| 34 | WARDHA | 2023-2024 | 2448 | 3327 | 0 | 5775 | 330 | 595 | 0 | 925 | 375 | 617 | 0 | 992 | 648 | 972 | 0 | 1620 | 3801 | 5511 | 0 | 9312 |
| 35 | WASHIM | 2023-2024 | 14440 | 21811 | 0 | 36251 | 2047 | 3791 | 0 | 5838 | 2245 | 3995 | 0 | 6240 | 4127 | 6023 | 0 | 10150 | 22859 | 35620 | 0 | 58479 |
| 36 | YAVATMAL | 2023-2024 | 5901 | 8746 | 0 | 14647 | 846 | 1542 | 0 | 2388 | 941 | 1595 | 0 | 2536 | 1662 | 2424 | 0 | 4086 | 9350 | 14307 | 0 | 23657 |
| | Total | | 310846 | 455971 | 0 | 766817 | 45555 | 81049 | 0 | 126604 | 50540 | 83008 | 0 | 133548 | 88742 | 124289 | 0 | 213031 | 495683 | 744317 | 0 | 1240000 |

प्रपत्र - ड

# वार्षिक वेळापत्रक सन २०२३-२४ (संभाव्य)

| अ.क्र. | महिना | स्तरनिहाय करावयाचे कामकाज | | |
|---|---|---|---|---|
| | | **जिल्हा स्तर ( शिक्षणाधिकारी - योजना, जिल्हा परिषद )** | **तालुका स्तर (गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती)** | **शाळा स्तर (प्राथ./माध्य./उच्च.माध्य.मुख्याध्यापक)** |
| १ | एप्रिल | **१.नियामक समिती बैठक- पहिली- दि. १ एप्रिल ते १५ एप्रिल**<br>**२.कार्यकारी समिती बैठक - पहिली- दि.१६ एप्रिल ते ३० एप्रिल** | १.जिल्हा स्तरावरून निर्धारित केलेल्या Target नुसार शाळांचे Target निश्चित करणे.<br>२.केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांची बैठक आयोजित करून Target पूर्ण करावयाचे नियोजन करणे.<br>२. योजनेचा तालुका/केंद्र/गाव पातळीवर प्रसार-प्रचार करणे. | १.योजनेच्या अंमलबजावणीची पूर्व तयारी करणे.<br>२.योजनेचा गाव पातळीवर प्रसार-प्रचार करणे.<br>३.तालुका स्तर समितीच्या वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार कामकाज करणे. |
| २ | मे | १.तालुका स्तर समितीच्या बैठकींच्या आयोजनाबाबत निर्देशित करणे.<br>२.Mobile App द्वारे स्वयंसेवकांचे सर्वेक्षण करणे व पुढील नियोजन करणे. | **१.नियामक समिती बैठक- पहिली- दि. १ मे ते १५ मे**<br>**२.कार्यकारी समिती बैठक - पहिली- दि. १६ मे ते ३० मे** | १.शाळा व्यवस्थापन व विकास समिती बैठकीमध्ये कामकाजाचे नियोजन करून प्रत्यक्ष mobile App द्वारे स्वयंसेवकांचे सर्वेक्षण करणे.<br>२. नोंदणीकृत स्वयंसेवकांची नावे व इतर आवश्यक माहिती वरिष्ठ कार्यालयास कळविणे. |
| ३ | जून | १.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत स्वयंसेवकांच्या अध्ययन-अध्यापन विषयक प्रशिक्षणाचे आयोजन करणे. | १. अध्ययन-अध्यापन विषयक प्रशिक्षण कार्यक्रमास स्वयंसेवकांना उपस्थित ठेवणे. | १. शाळा व्यवस्थापन व विकास समिती बैठकीमध्ये कामकाजाचे नियोजन करून प्रत्यक्ष mobile App द्वारे स्वयंसेवकांमार्फत निरक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण करणे व स्वयंसेवकांचे प्रशिक्षण पूर्ण करून घेणे |
| ४ | जुलै | १.प्रशिक्षित स्वयंसेवकांना प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन विषयक कामकाज सुरु करणेबाबत सूचित करणे. | १.प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन विषयक कामकाजाचे नियोजन करणे व कामकाज सुरु करणे. | १. प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन कामकाज करणे. |
| ५ | ऑगस्ट | १. कार्यकारी समितीच्या दुसऱ्या बैठकीचे आयोजन/नियोजन करणे | १. कार्यकारी समितीच्या दुसऱ्या बैठकीचे आयोजन/नियोजन करणे | १. प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन कामकाज करणे |
| ६ | सप्टेंबर | **१. कार्यकारी समिती बैठक- दुसरी- दि. १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर** | **१. कार्यकारी समिती बैठक- दुसरी- दि. १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर** | १.प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन कामकाज करणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | ऑक्टोबर | १. स्तर मापन चाचणी परीक्षा- (प्रथम सहामाही) नियोजन/आयोजन करणे. | १. स्तर मापन चाचणी परीक्षा- (प्रथम सहामाही) नियोजन/आयोजन करणे. | १.प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन कामकाज करणे.<br>**२.स्तर मापन चाचणी परीक्षा - (प्रथम सहामाही)**<br>**दि.१ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर** |
| ८ | नोव्हेंबर | १. स्तर मापन चाचणी नंतरचे अनुषंगिक कामकाज. | १. स्तर मापन चाचणी नंतरचे अनुषंगिक कामकाज. | १.स्तर मापन चाचणी नंतरचे अनुषंगिक कामकाज.<br>२.प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन कामकाज करणे. |
| ९ | डिसेंबर | १.स्तर मापन चाचणीच्या निकालाचे जि.शि.व प्र संस्थेमार्फत विश्लेषण करून त्यानुसार निरक्षरांच्या प्रगतीबाबतची कार्यवाही करावी. | १.स्तर मापन चाचणीच्या निकालाचे जि.शि.व प्र संस्थेमार्फत विश्लेषण करून त्यानुसार निरक्षरांच्या प्रगतीबाबतची कार्यवाही करावी. | १. स्तर मापन चाचणीच्या निकालाच्या आधारे जि.शि.व प्र. संस्थेमार्फत केलेल्या विश्लेषनानुसार अध्ययन अध्यापन कामकाज करणे. |
| १० | जानेवारी | १.नियामक व कार्यकारी समितीच्या दुसऱ्या बैठकीचे आयोजन/नियोजन करणे | १.नियामक व कार्यकारी समितीच्या दुसऱ्या बैठकीचे आयोजन/नियोजन करणे | १. प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन कामकाज करणे |
| ११ | फेब्रुवारी | **१. नियामक समिती बैठक- दुसरी- दि. १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी**<br>**२. कार्यकारी समिती बैठक - तिसरी- दि.** १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी<br>३. स्तर मापन चाचणी परीक्षा- दुसरी सहामाहीचे नियोजन व आयोजन करणे. | **१.नियामक समिती बैठक-** दुसरी- **दि.** १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी<br>**२.कार्यकारी समिती बैठक - तिसरी- दि.** १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी | १.प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन कामकाज करणे.<br>**२.स्तर मापन चाचणी परीक्षा-**<br>दि.१५ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी |
| १२ | मार्च | १. सदर योजनेंतर्गत झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे. | १.स्तर मापन चाचणी नंतरचे अनुषंगिक कामकाज. | १.स्तर मापन चाचणी नंतरचे अनुषंगिक कामकाज. |

**( टीप- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था- सर्व यांचे वार्षिक नियोजन SCERT, पुणे यांच्यामार्फत निर्गमित करण्यात येईल.)**

प्रपत्र - इ

सन २०२३-२०२४

## जिल्हा व तालुका स्तरावरील बैठकांचे आयोजन वेळापत्रक (संभाव्य)

| जिल्हा स्तर | | तालुका स्तर | |
|---|---|---|---|
| नियामक समिती बैठक | कार्यकारी समिती बैठक | नियामक समिती बैठक | कार्यकारी समिती बैठक |
| १. पहिली- दि.१ एप्रिल ते १५ एप्रिल | १. पहिली- दि. १६ एप्रिल ते ३० एप्रिल | १. पहिली- दि. १ मे ते १५ मे | १. पहिली- १६ मे ते ३० मे |
| -- | २. दुसरी- १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर | -- | २. दुसरी- १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर |
| २. दुसरी- दि. १ फेब्रुवारी ते दि. १५ फेब्रुवारी | ३. तिसरी- १ फेब्रुवारी ते दि. १५ फेब्रुवारी | २. दुसरी- १ फेब्रुवारी ते दि. १५ फेब्रुवारी | ३. तिसरी- १ फेब्रुवारी ते दि. १५ फेब्रुवारी |

## शाळा स्तरावरील स्तरमापन चाचणी परीक्षा वेळापत्रक (संभाव्य)

| अ.क्र. | स्तर मापन चाचणी | कालावधी |
|---|---|---|
| १ | पहिली | दि.१ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर |
| २ | दुसरी | दि.१५ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी |